# वृक्ष संरक्षण व संवर्धन प्राधिकरण
## पुणे महानगरपालिका
## जाहीर निवेदन

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन (सुधारणा) अधिनियम १९९५ व २००९ नुसार व मे.उच्च न्यायालय,मुंबई यांचे आदेशान्वये पुणे महानगरपालिका हद्दीतील धोकादायक वृक्ष /बांधकामास अडथळा करणारे वृक्ष पुर्ण काढणे /पुनर्रोपण करणे /बांधकामास पुर्णत्वाचा दाखला घेणे /बांधकाम पुर्व ना हरकत पत्र घेणे यासाठी खालीलप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | अ) वृक्ष प्राधिकरणाकडे करावयाचे अर्ज | अर्जासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | मिळकतीमधील बांधकाम नकाशा मान्य करणेसाठी बांधकामासाठी पुर्व ना हरकत दाखला घेणेबाबत | १) अर्ज<br>२) मान्य होण्या पुर्वीच्या नकाशावर मिळकतीवर अस्तित्वात असणारे वृक्ष हिरव्या रंगाने दाखवावे. |
| २ | प्रत्यक्ष बांधकामास अडथळा करणारे वृक्ष काढणे/वृक्षांचे पुनर्रोपण करणे/बांधकामास अडथळा करणाऱ्या वृक्षांच्या फांद्या काढणे. | १) प्रपत्र सी कलम ८(३) खालील अर्ज<br>२)बांधकाम चालू करणेचा दाखला (कमिन्समेंट सर्टिफिकेट)<br>३) मनपा मान्य नकाशावर तोडावयाचे वृक्ष लाल रंगाने व उर्वरित वृक्ष हिरव्या रंगाने दाखवावेत.<br>४) तोडावयाच्या वृक्षांच्या बदली लावणेत येणारे नविन वृक्ष व प्रस्तावित पुनर्रोपण करणारे वृक्ष निळ्या रंगाने दाखविणेत यावेत.<br>५) तोडावयच्या वृक्षांचे फोटो,शक्य असल्यास<br>६) जागेच्या मालकी हक्कासंबधीचे कागदपत्रे<br>७) प्रपत्र डी कलम ११ (२) खालील हमीपत्र |
| ३ | बांधकामासाठी अडथळा करणारे वृक्ष काढणे प्रित्यर्थ भरलेली अनामत रक्कमेची मागणी करणे. | १) अर्ज<br>२) अनामत भरलेल्या रक्कमेची मुळ चलन पावती<br>३) मान्य नकाशावर संवर्धन केलेल्या वृक्षांचे ठिकाण हिरव्या दाखविणेत यावे. |
| ४ | बांधकामासाठी पुर्णत्वाचा दाखला मिळणेबाबत | १) अर्ज़<br>२) बांधकाम चालू करणेचा दाखला (कमिन्समेंट सर्टिफिकेट)<br>३) मनपा मान्य नकाशावर मिळकतीमध्ये लागवड केलेल्या वृक्षाचे ठिकाण तसेच लागवडीचा दिनांक सह हिरव्या रंगाने दाखवावेत.<br>४) पुर्वी देण्यात आलेल्या वृक्षतोडीची परवानगीची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.<br>५) वृक्षतोडीच्या बदली नविन वृक्ष लागवड केलेली असणे आवश्यक आहे. |

- <u>टीप –</u> बांधकामासाठी अडथळा करणारे वृक्ष काढणे /पुनर्रोपण करण्याची सद्यस्थितीची कार्यवाही खालीलप्रमाणे
  1. १) अर्जाची खात्यामार्फत बांधकाम मिळकतीमधील वृक्षांची पाहणी करणे
  2. २) खात्याचे समक्ष पाहणी अहवालानंतर तज्ञ समितीची समक्ष पाहणी करून अभिप्राय घेणे
  3. ३) सदरहू अहवालावर नागरिकांचे आक्षेप मागविणे
  4. ४) वृक्ष प्राधिकरणाचे मान्यतेसाठी वृक्ष पाहणीचे अहवाल सादर करणे
  5. ५) क्र.२ मधील अहवाल मे.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या मान्यतेसाठी सादर करणे.
  6. ६) मे.उच्च न्यायालय,मुंबई यांची मान्यता मिळाल्यानंतर खात्याकडून परवानगी देणेची कार्यवाही केली जाईल.

उद्यान अधिक्षक (वृक्ष)<br>
पुणे महानगरपालिका.